## <u>निशाणी क्रमांक ०१ वर आदेश</u>

१. अर्जदाराने प्रस्तूतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम, १८२७ चे कलम–२ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार इन्तियाजबेगम चांद शेख ही मयताची पत्नी आहे. मारोती महादेव खोले हे जन्माने हिंदू होते व त्यांनी हिंदू धर्माचा त्याग करुन मुस्लीम धर्म स्विकारला होता व त्यानंतर त्यांचे नाव शेख चांद नियाज शेख उर्फ महादेव शेख असे झाले व ते दि.०५/०९/२०२० रोजी नागपूर येथे मरण पावले. मयत **शेख चांद नियाज अली उर्फ महादेव शेख** यांचे दि. ०५/०९/२०२० रोजी नागपूर, तह.जि.नागपूर येथे निधन झाले आहे. मयतास उपरोक्त वारस असून इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराने शासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणात कोणाची काही हरकत आहे का ? याबाबत जाहीर प्रगटन निशाणी क्र.१८ वर 'दैनिक मराठी महाविदर्भ' या वर्तमानपत्रात दि.१० मे, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. परंतु, अद्याप सदर प्रकरणात कोणाचीही काहीएक हरकत प्राप्त झाली नाही.

४. अर्जदार इन्तियाजबेगम चांद शेख यांनी अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.१३ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने सदर शपथपत्रामध्ये प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकुराचा समावेश केलेला आहे. उपरोक्त वारसदार हेच मयताचे एकमेव वारस आहेत व त्यांच्याशिवाय इतर वारस नाहीत, असे नमुद केले आहे. अर्जदाराने मयताच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१५ वर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,मयत **शेख चांद नियाज अली उर्फ महादेव शेख** यांचे दि. ०५/०९/२०२० रोजी चुना मस्जीद टिमकी, नागपूर, नागपूर अर्बन, नागपूर येथे निधन झाले आहे. अर्जदाराने स्वतःचे आधारकार्डची पडताळणी प्रत नि.क्र.१६ वर, महाराष्ट्र शासन राजपत्राची पडताळणी प्रत नि.क्र.१७ वर, पेपरमध्ये प्रकाशीत जाहीरनाम्याचे बिल

नि.क्र.१९ वर अभिलेखावर दाखल केले आहे. तसेच मृतकाच्या मृत्यू प्रमाणपत्रात त्याचा कायम स्वरुपी पत्ता हा चुना मस्जीद टिमकी, नागपूर, नागपूर अर्बन, नागपूर असा असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराने विद्यमान न्यायालयास सदरचा अर्ज चालविण्याचा अधिकार असल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराने नि.क्र.२८ खाली मयत **शेख चांद नियाज अली उर्फ महादेव शेख** यांच्या बँक पासबुकचे पहिले पानाची पडताळणी प्रत, मयत **शेख चांद नियाज अली उर्फ महादेव शेख** यांच्या गॅस कनेक्शन कार्डची पहिल्या पानाची पडताळणी प्रत, विक्रीपत्राची पडताळणी प्रत, घरटॅक्स भरल्याबाबतची पावतीची पडताळणी प्रत, मारोती महादेव खोले यांच्या नावाची ७/१२ उता–याची डिजीटल प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. अर्जदाराने नि.क्र.१७ खाली दाखल केलेल्या राजपत्रावरुन तसेच ७/१२ उता–यावरुन मयत **शेख चांद नियाज अली उर्फ महादेव शेख** हे भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर येथील रहीवासी असल्याचे व त्यांनी त्यांचे पुर्वीचे नाव मारोती महादेव खोले बदलल्याचे दिसून येते.

अर्जदारातर्फे सा.क्र.२ शंकर महादेव खोले यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१४ वर दाखल करुन ते मारोती महादेव खोले यांना ओळखत असल्याचे व तो त्यांचा सख्खा भाउ असल्याचे व तो जन्मतः हिंदू धर्मीय होता, परंतु त्याने १९८८ मध्ये इस्लाम धर्म स्विकारला आणि शेख चांद हे नाव धारण करुन मुसलमान झाला व तेव्हा पासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत मुस्लीमच राहीला व त्याला ते व त्यांचे नातेवाईक शेख चांद या नावाने संबोधन करीत होते, असे शपथेवर कथन केले आहे. त्यांनी अर्जदार इन्तियाजबेग यांना ओळखत असल्याचे, ती त्यांचे वहीनी म्हणजे मृतक शेख चांद यांची विधवा पत्नी असल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यांनी मृतक शेख चांद अणि त्यांचे वडील महादेव हे सुध्दा इस्लाम धर्म स्विकारुन नियाझअली हे नाव धारण करुन मुस्लीम झाले होते व मृत पावल्याचे व त्यांच्या मृत्यूपर्यंत ते मुस्लिमच राहले, पण त्यांनी त्यांचे हे मुस्लीम नाव कोणत्याही सरकारी दस्तऐवजात नोंदवून घेतले नव्हते म्हणून त्यांचे मुस्लीम नाव असलेले (शेख चांद च्या मृत्यू दाखल्या शिवाय) कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे, त्यांची आई सुध्दा मृत झाल्याचे व ती तिच्या मृत्यूपावेतो हिंदू धर्मीयच राहील्याचे शपथेवर कथन

केले आहे. धर्मांतर केल्या नंतर मृतक मारोतीने अर्जदार नामे इंतीयाजबेगम या जन्माने मुस्लीम असलेल्या मुस्लीम महिलेसोबत मुस्लीम धर्मीय रितीरिवाजानुसार लग्न/निकाह केले व त्या लग्नात ते उपस्थीत होते, तेव्हा पासून तर मृतक मारोतीच्या मृत्यू पावेतो म्हणजे दि.०५/०९/२००५ पावेतो दोघांनीही भद्रावती येथे एकत्र राहून संसार केला पण त्यांना वैवाहीक संबंधातून मुलबाळ झाले नाही व अर्जदार ही एकटीच मृतक शेख चांद यांची वारस असल्याचे शपथेवर कथन केले. अर्जदारातर्फे नि.क्र.२२ खाली मृतक यांची आई भागेरता महादेव खोले यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत दाखल केली आहे. त्यावरुन मयताची आई भागेरता महादेव खोले मयत झाल्याचे दिसून येते. अर्जदारातर्फे नि.क्र.२३ खाली मृतक यांचे वडील महादेव लक्ष्मण खोले यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत दाखल केली आहे. त्यावरुन मयताचे वडील महादेव लक्ष्मण खोले मयत झाल्याचे दिसून येते. सदर साक्षीदार यांनी त्यांची आधार कार्डची पडताळणी प्रत नि.क्र.२४ वर दाखल केली आहे. अर्जदाराने नि.क्र.२५ वर पुरसीस दाखल करून पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदाराने दिलेल्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. उपरोक्त वारसदारांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता असे दिसून येते की, उपरोक्त वारसदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, मी पुढील आदेश करीत आहे;

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार **इन्तियाजबेगम चांद शेख** ही मयत**(मारोती महादेव खोले)/ शेख चांद नियाज अली उर्फ महादेव शेख** यांची वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

३) सिव्हील मॅन्युअल प्रकरण–१४ मधील परिच्छेद–३१२ प्रमाणे मूळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमूद करावी.

इन्तियाजबेगम – **वि.** कोणी नाही

CNR No.- MHCH070005432025

४) अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर केला असे.)

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.04.04 10:32:21 +0530

**(ए.एस. जरुदे)**

दिनांकः– ३१/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भद्रावती